## प्रकरण - २

# माणदेश आणि माणदेशी साहित्य

## प्रकरण - २ रे

# माणदेश आणि माणदेशी साहित्य

२.१ **प्रस्तावना**

२.२ **माणदेश स्वरूप आणि विस्तार**

२.२.१ माणदेश संकल्पना

२.२.२ माणदेश स्थान

२.२.३ प्राकृतिक रचना

२.२.४ हवामान

२.२.५ जमीन

२.२.६ पाऊस

२.३ **माणदेशाचे वेगळेपण प्रदेशनिष्ठ विशेष.**

२.४ **माणदेशी साहित्य परंपरा.**

२.५ **सीताराम सावंत यांचे वाङ्मयीन चरित्र / परिचय.**

२.६ **समारोप**

# प्रकरण - २ रे

# माणदेश आणि माणदेशी साहित्य

**प्रस्तावना :-**

माणदेश हा पश्चिम महाराष्ट्रातील वैशिष्ट्यपूर्ण भू-भाग आहे. महाराष्ट्रातील वेगवेगळ्या प्रदेशाप्रमाणे माणदेशाला भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक व नैसर्गिक वेगळेपण लाभलेले आहे. या भागामध्ये उघडी बोडकी माळराने, काटेरी खुरटी झुडूपे, झाडे, जागोजागी वेडेवाकडे डोंगर, लांबट टेकड्या असा हा दगडगोट्यांचा प्रदेश आहे. या प्रदेशात कायम पावसाची अनिश्चितता असते. परिणामी हंगामी नद्या, अनियमित शेती, ओल्या चाऱ्याचे दुर्भिक्ष, बारमाही पाणी टंचाई आणि दुष्काळाचे सावट यातून येथील जनता हवालदिल झालेली दिसते.

सांगली सातारा सोलापूर या तीन जिल्ह्यांच्या सीमारेषेवर पसरलेला माणदेश असंख्य पिढ्यांपासून दुर्लक्षित व मागास राहिलेला आहे. आपला देश स्वतंत्र होऊन साठ वर्षे झाली तरीही या प्रदेशाचा लोकशाही राजवटीतून फारसा विकास झाला नाही. इतक्या वर्षांच्या स्वातंत्र्यातील एकाही राजवटीला माणदेशाचा विकास साधावा असे कधीच का वाटले नाही ? असा प्रश्न पडतो. एखाद्या देशाचा विकास म्हणजे विशिष्ट प्रदेशातील समाजाचा विकास. तो विकास शासनकर्त्यांनी केलेला आढळत नाही.

सुमारे २० वर्षापूर्वी दहिवडी (जिल्हा सातारा) येथे संपन्न झालेल्या 'माणदेश ज्ञानपीठाच्या' साहित्य संमेलनात अशी मागणी केली होती की "माणदेश हा स्वतंत्र जिल्हा व्हावा." पण निष्क्रिय सरकारने त्यावर काहीच भूमिका घेतली नाही व या प्रदेशाचा विकासही साधला नाही. निष्क्रिय शासनाचे तेवढेच क्रियाशील असणारे लोकप्रतिनिधी त्याकडे सहजपणे दुर्लक्ष करतात. दर पाच वर्षाला मताचा जागेवा घेऊन, आश्वासने देतात व नंतर ती खोटी ठरवितात व जनतेला फसवत दिवस पुढे ढकलताना दिसतात.

अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, पाणी या मूलभूत व जीवनावश्यक गरजांचा माणदेशात वानवा आहे. पाणी हे देखील अनेक समस्यांचे मूळ आहे. कोणत्याही राजवटीने या भागातील पाणी प्रश्नाकडे लक्ष दिले नाही. नेहमी दरवर्षी पाणी परिषद भरविली जाते. तेवढ्यापुरती आश्वासने दिली जातात.

माणदेशाचे समाजजीवन हे अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. तेथील समाजामध्ये विशिष्ट प्रकारच्या चाली, रीती, परंपरा पाळल्या जातात. तेथील लोक सदैव अंधश्रद्धेमध्ये गुरफटलेले दिसून येतात. निसर्गाची अवकृपा तर त्यांच्या पाचवीलाच पुजलेली असते. यातच प्रत्येकजण देव-देवतांना पुजनीय मानून

त्यांकरिता अनाठायी वेळ व पैसा खर्च करतात. ''माणदेशी देव्हाऱ्यात शिखर शिंगणापूरचा शंभू महादेव, म्हसवडचा सिद्धनाथ, काळ चौंडीचा भोजलिंग, खरसुंडीचा श्री सिद्धनाथ, अरेवाडीचा विरोबा, जतची यल्लमा, लोटेवाडी, डोंगरगावचा म्हसोबा, कोळ्याची लक्ष्मी, सांगोल्याची अंबिकादेवी, या देव-देवतांना विशेष महत्त्व आहे.''[१] माणदेशातील माणसाचे वेगळेपण एकत्र कुटुंबपद्धती, सामुहिक समाजजीवन, विशिष्ट निसर्ग, दगडगोट्यांचा माळरान प्रदेश यातून पहावयास मिळते.

माणदेशाचा परिसर रूक्ष आहे. येथे पूर्णपणे फुललेली शेती, हिरवेगार गवत, निसर्गरम्य वातावरण, डेरेदार वृक्ष, बारमाही बागायत, धडधाकट जनावरे इ. कोठेच आढळत नाहीत. आढळते ते दगड गोटे, काटेरी खुरटी झाडी, हंगामी शेती, पिण्याच्या पाण्याची टंचाई. एकूणच दुष्काळ सदृश्य परिस्थिती. अशा निसर्गाशी जीवनघेणा संघर्ष करीत येथील जनता केवळ जीवन कंठत आहे.

माणदेशाच्या परिसरातील वेगळेपण विविध कादंबऱ्यामधून पहावयास मिळते. या परिसरातील समाजजीवनाशी, दु:खाशी, सहनशील परिस्थितीत, गांजलेली, माणसे, निसर्गाशी संघर्ष करणारी रूक्ष जीवन जगतात. त्याच गावातील आपापसातील हेवेदावे, भानगडी, इर्षा, शेती, पिके, जनावरे यांच्यामधून संघर्ष किती तीव्र असू शकतात याचे चित्रण दिसते. माणदेशी कादंबरी माणदेशी मातीतून आपसूक उगवलेली वेल आहे. माणदेशी समाजजीवनाशी ती इतकी एकरूप झाली आहे की, तेथील माणसानेच आपली गोष्ट सांगावी असा भास होतो. माणदेशातील लेखक ज्या मातीत जन्मले, वाढले, लेखन करू लागले. त्यांनी आपला प्रदेश विविध अंगांनी लोकांना दाखवून दिला आहे. त्यांची कादंबरी ही माणदेशी मातीशी नाते सांगताना दिसते.

माणदेशाविषयी आनंद विंगकर आपल्या ''एन्. एच. ७६ आणि सभोवतालचा प्रदेश अर्थात प्राचीन पाटण पंढरपूर रोड'' या कवितेत म्हणतात;

''प्रथम हा भूप्रदेश कोणत्याही महाकाव्यात
सापडत नाहीत इथले संदर्भ
ना पुराणातील शिळा ना बौद्धांच्या गुंफा
इथल्या दुर्मिळ खडकावर अथवा तुरळक पर्वतात
उमटल्या नाहीत कोणाच्या पादूका
धनगरी ओव्या आणि जात्यावरच्या गीतात
जतन करून ठेवल्या त्यांनी आपल्या मातीच्या व्यथा
छेडते नाही कुणी युद्ध उभारला नाही एखादा गड

झाले नाही कोणी

या अथांग पसरलेल्या माळावरचे अनभिषिक्त सम्राट''[२]

## २.२ माणदेश स्वरूप व विस्तार :-

माणदेश हे नाव पूर्वीपासून रूढ आहे. पंढरपुरच्या विठ्ठल मंदिरातील 'चौऱ्यांशच्या शिलालेखात' (इस. १२७३-१२७५) माणदेशाचा उल्लेख आहे. त्या पूर्वीपासूनच 'माण परगणा' हे नाव या प्रदेशाला होते. माणदेशातील 'माण' या कठीण खडकामुळे येथे वाहणाऱ्या नदीला 'माणगंगा' हे नाव मिळाले. तर माण नदीवरून माणदेश हे नाव पडले.

### २.२.१ माणदेश संकल्पना :-

१. सांगली, सातारा, सोलापूर या तीन जिल्ह्यांचा सीमाप्रदेश म्हणजे माणदेश होय.

२. भीमा नदीला उजवीकडून मिळणाऱ्या माण नदीच्या खोऱ्यातील प्रदेश माण नदीला जिथून जिथून पाणी येऊन मिळते तो पाणलोट क्षेत्राचा भाग म्हणजे माणयदेश होय.[३]

४. निसर्गाची सर्वच दृष्टीने अवकृपा असलेला माळरानाचा प्रदेश म्हणजे माणदेश होय.[४]

म्हणजेच माण नदीच्या खोऱ्यातील प्रदेश माण नदीला विविध नद्या ओढे ओहळ येवून मिळतात तेथील प्रदेश म्हणजे माणदेश होय. माण नदीला वाघजाई किंवा वाघीचाळ नदी, बालतोरा किंवा बालतेरा नदी, बेनवण नदी, कोरडा नदी, अप्रुपा नदी यासारख्या विविध नद्या येऊन मिहतात. त्या नद्यांना जेथून जेथून पाणी आले तो प्रदेश म्हणजे माणदेश होय.

माणदेशात सांगली जिल्ह्यातील संपूर्ण आटपाडी तालुका, जत तालुक्यातील ३१ गावे, कवठेमहंकाळ तालुक्यातील १४ गावे, सातारा जिल्ह्यातील माण तालुका, खटाव तालुक्यातील एक गाव, सोलापूर जिल्ह्यातील सांगोला जिल्ह्यातील ८१ गावे, पंढरपुर तालुक्यातील १२ गावे तर मंगळवेढा तालुक्यातील २२ गावांचा समावेश होतो.

माणदेशाच्या नावाविषयी कृष्णा इंगोले ऐतिहासिक पुरावा देताना म्हणतात, ''राष्ट्रकूट राजघराण्यातील सर्वात प्राचीन राजा मानाङ्क याने कुंतल देशात (कृष्णा खोऱ्यात) राज्य स्थापन केले. त्याची राजधानी माणपूर (सध्याचे राजेवाडी तलावातील विस्थापित देवापूर) येथ होती. या मानङ्क राजाचा देश म्हणून 'माणदेश' असे नाव पडले असावे.''[५]

**२.२.२ माणदेशाचे स्थान :-** माणदेश ७४ अंश २२ मी. ३० सें. ते ७५ अंश ३० मी. पूर्व रेखांशांवर आहे. त्याचा अक्षांक्ष १७ अंश उत्तर अक्षांश ते १७ अंश ५१ मी. ४१ सें. उत्तर अक्षांश असा आहे.

माणदेशाचा पूर्व-पश्चिम विस्तार ११६.८ कि.मी. इतका असून दक्षिण-उत्तर विस्तार ९१.२ कि.मी. इतका आहे.

माणदेश शंभू महादेवाच्या शिखर शिंगणापूर पासून जतच्या यल्लमा देवीपर्यंत पसरलेला आहे. भिवघाट शुक्राचार्यापासून ते मंगळवेढा पंढरपूर रोडपर्यंत माणदेश पसरलेला आहे. तसेच कुळकजाईपासून ते सरकोली पंढरपुरपर्यंतच्या भागास माणदेश म्हणता येईल.

माणदेशात विस्ताराच्या मानाने व २१० गावाच्या मानाने कमी लोकसंख्या आढळते. माणदेशात सुमारे सव्वासात लाख लोकसंख्या आहे.

**२.२.३ प्राकृतिक रचना :-** माणदेश हा महाराष्ट्राचा पठाराचा एक भाग असून त्याची रचना 'बेसाल्ट' नावाच्या अग्निजन्य खडकांपासून झाली आहे. माणदेशाची सीमा शंभू महादेवाची मुख्य डोंगररांग व तिची उत्तरेकडील एक उपशाखा यांनी पश्चिम व उत्तर सीमा निश्चित केली आहे. नीरा नदीचा उजवा कालवा फाटा क्र. ३ काढण्यात आला आहे. तो उर्वरित उत्तर सीमा समजावी. शंभू महादेवाच्या मुख्य डोंगररांगेने माणदेशाचा पश्चिम दक्षिण विस्तार मर्यादित केला आहे. या प्रदेशाच्या दक्षिणेला कुकुडवाड येथे वैशिष्ट्यपूर्ण खिंड आहे. या खिंडीतूनच म्हसवड-मायणी रस्ता जातो. खिंडीच्या पूर्वेस जीरे पठार असून त्याची उंची ३५६ मी. इतकी आहे. तेथे द्रोणी तयार झाली आहे. कुकडवाडच्या पूर्वेस अनेक सुट्या टेकड्या आहेत. त्यापैकी भोजलिंग डोंगर महत्त्वाचे (८७८ मी.) आहे. त्याच्या पश्चिमेला एक खिंड आहे. तिला तरसवाडी खिंड घाट म्हणतात. तेथून पंढरपूर-मल्हारपेठ रस्ता जातो.

पुढची खिंड नेलकरंजी खानापूर रस्त्यावर असून त्या खिंडीला रामघाटवाला असे म्हणतात. ही शाखा पुढे पळशी, हिवतड, डोंगरपाचेगाव, कोळे या भागात विकसित होते. या परिसरात भवानी खाडी, शुक्राचार्याचे डोंगर, परमेश्वर डोंगर, भोपाळगड, सातपारा, कुडहखडी, येसनखडी, हालबेल डोंगर व महादेव डोंगर असे डोंगर येतात. येथे त्रिवेणी आकाराची द्रोणी तयार झाली आहे. येथे थोरले लग्न व धाकटे लग्न अशी दोन डोंगरांची बेटे आहेत. डोंगररांगांनी वेढलेल्या परिसरात डोंगर पाचेगाव आहे. त्या डोंगराच्या आग्नेय पायथ्याला किडेबिसरी हे गाव आहे.

नागजच्या पश्चिमेला ८८९ मी. उंचीचे डोंगर आहेत. नागजपासून सोलापूर-कोल्हापूर रस्ता जातो. नागजपासून जतपर्यंत एक जल विभाजक रेषा आहे. ढालगाव ते किल्ले जतपर्यंत डोंगरकपारित व उंचवट्यामध्ये गावे वसलेली आहेत. जतच्या पूर्वेपासून माण खोरे, दोड्डा नाला, भीमा खोऱ्याची सीमा निश्चित केली आहे. तो तसाच उंचवट्याचा भाग सरकोलीपर्यंत पसरलेला आहे. प्राकृतिक रचनेच्या दृष्टीने माणदेशाचा नैऋत्य - पश्चिम - वायव्य भागच वैशिष्ट्यपूर्ण आहे.

**२.२.४ हवामान :-** माणदेशाचे हवामान सर्वसाधारणपणे समशीतोष्ण असले तरी उष्ण व निमशुष्क स्वरुपाचे आहे. दहा महिने स्वच्छ सूर्यप्रकाश आणि कोरडे हवामान ही या प्रदेशाला मिळालेली नैसर्गिक देणगी आहे. अति उष्ण उन्हाळा, उबदार हिवाळा, अनिश्चित पावसाळा असे इथले ऋतुमान आहे. माणदेशात मे महिन्यात कमाल तापमान ४४.५° सें. ग्रे. असते. तर जानेवारीत किमान तापमान १३.६° सें. ग्रे. असते. आर्द्रता ७०% पेक्षा कमी असते. मुळात पाणी पाऊसमान आणि जंगल झाडी कमी असल्यामुळे उष्णतेने जास्तीत जास्त बाष्पीभवन होत असल्यामुळे माणदेशाचे हवामान निम शुष्क स्वरूपाचे झाले आहे.

**२.२.५ जमीन :-** माणदेशातील लोकांचा शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. पावसाच्या अभावामुळे येथे हवे तितके उत्पादन मिळू शकत नाही. तसेच येथील जमीन 'बेसॉल्ट' नावाच्या खडकांपासून तयार झालेली आहे. रासायनिक पदार्थाचे अल्पप्रमाण, कमी पावसाला जंगलाभावी बाष्पीभवनाचे अधिक प्रमाण यामुळे जमिनीच्या कसात फरक पडला आहे.

माणदेशाच्या जमिनीविषयी कृष्णा इंगोले म्हणतात, ''माणदेशात सर्वसाधारणपणे पाच प्रकारची जमीन आढळते. माळरान, तांबडतोंडी, चिकन, करल जमीन व काळी जमीन. सलग एकाच प्रकारची जमीन फारशी नाही. माळरानाची बरीचशी जमीन पडिक असून पाण्याची सोय उपलब्ध झाल्यास ती लागवडीखाली येऊ शकते.''[६]

माणदेशातील बरीचशी जमीन माळरान असल्याने ती पडिक आहे. पाणी उलपब्ध झाल्यास ही जमीन लागवडीखाली आणता येते. तांबडतोंडी जमिनीतून पाण्याचा निचरा लवकर होत असल्याने ती बागायत होऊ शकत नाही. अलीकडे शेतकरी या प्रकारच्या जमिनीत डाळिंब, बोर या प्रकारची पिके घेऊ लागला आहे. येथील बराचसा भाग डोंगर टेकड्यांनी व्यापलेला आहे.

माण नदीच्या खोऱ्यातील व तिला येऊन मिळणाऱ्या इतर नद्यांच्या खोऱ्यातील जमिनी खोल आढळतात. त्या सुपिक आहेत. नदीकाठच्या भागाकडून जसजसे सीमाभागाडे जावे तसतशी जमिनीची खोली कमी कमी होत जाते. उथळ जमिनीत लोह व सेंद्रिय यांचे प्रमाण फारच कमी असल्याने त्या नापीक आहेत. माण नदीच्या मधल्या म्हसवड ते वाटंबरे टप्प्यात जमिनी तांबड्या मुरमाड व काळ्या रंगाच्या आहेत. तर शेवटच्या वाटंबरे ते सरकोली टप्प्यात जमिनी शेतीयोग्य आहेत.

**२.२.६ पाऊस :-** माणदेशात पावसाची अनिश्चितता फार मोठ्या प्रमाणात आढळते. सर्वसाधारणपणे मे-जून मध्ये चुकून वळवाचा पाऊस पडतो. नाहीतर जूनच्या उत्तरार्धात किंवा जुलैच्या पूर्वार्धात पावसाला प्रारंभ होतो. त्यावर शेतकरी खरीप पेरण्या करतात. ऑगस्टमध्ये ढगाळ वातावरण असून ताशी २०

कि.मी. वेगाने वारे वाहते व पावसाच्या हलक्या सरी पडतात. गेल्या ४० वर्षात खरीप पिकांचा कोणताच भरवसा देता आला नाही. हा येथील शेतकऱ्यांचा अनुभव आहे. सप्टेंबरमध्ये माणदेशात वर्षातील ६०% पाऊस पडतो. त्यावर पेरण्या व पिके येतात.

## २.३ माणदेशाचे वेगळेपण प्रदेशनिष्ट विशेष : -

सांगली, सातारा आणि सोलापूर या तीन जिल्ह्यांच्या सीमारेषेवर पसरलेल्या या माणदेशाचे वेगळेपण वाखाणण्यासारखे आहे. माणदेशातील लोकांच्या मनावर विशिष्ट प्रकारच्या चाली, रीती, रूढी, परंपरा, यांचा प्रभाव फार मोठ्या प्रमाणावर आढळून येतो. त्यांची अंधविश्वासाची वृत्ती फार जुनी आहे. त्यांचे जगणे किती कष्टमय आहे याचे प्रत्यंतर या भागात वावरताना येते. दुष्काळी मुलुख, जनसामान्यांना जगण्यासाठी करावे लागणारे स्थलांतर, पाऊसमान कमी, टंचाईची स्थिती, दिवसेंदिवस वाढत जाणारा दुष्काळ, उघडी बोडकी माळराने, शुष्क वनस्पती, वाढती शेतमजुरांनी संख्या, रोजगाराशिवाय खडतर जगणे अशा संकटांना तोंड देत येथील लोकजीवन जगत असतात.

''पर्वतांच्या पसरलेल्या रांगांत समाविष्ट होणारा भूप्रदेश अशा प्रकारची विभागणी सामान्य माणसाला स्थूल स्वरुपात नेहमी जाणवते. नद्यांच्या खोऱ्यामुळे अथवा डोंगरांच्या विस्तारामुळे त्या भूभागाला भौगोलिक वेगळेपण प्राप्त झाले आहे. भौगोलिक वेगळेपणातूनच शेतीवर उभी असलेली समाजव्यवस्था वेगळी वैशिष्ट्ये जोपासताना आपणाला जाणवते. त्यातूनच एक प्रकारे अस्पष्टपणे जाणवणारे सांस्कृतिक पृथकत्व स्पंदन पावत असते. त्या स्पंदनाचे रंगाविष्कार लोकजीवनातून लोककला सण सोहळ्यातून आणि पीकपाणी आहार आचारातून प्रगट होत असतात.''[७] अशा माणदेशाची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे सांगता येतील.

**२.३.१ खिलार जनावरे :-** माणदेशाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे खिलार जनावरे होय. ही जनावरे माणदेशाचे धन आहेत. आकर्षक शरीरयष्टी, देखणी, चपळ खिलार गाय, बैल, खोंड, कालवड यांचे माहेरघर माणदेश आहे. खिलार जनावरे ऊन वारा, वादळी पाऊस, चारा टंचाई व दुष्काळ अशा समस्येवर मात करून आपल्या धन्याची सेवा करतात. माणदेशात खिलार गायीला फार पवित्र मानले जाते. गाय आणि माय समान मानले जाते. गायीच्या ठायी ३३ कोटी देव असतात अशी येथील लोकांची समजूत आहे. चारा टंचाईच्या काळात गायीला कोणीही विकत नाही तर तिला दुसऱ्याला सांभाळायला दिले जाते. दान दिली जाते.

खिलार जनावरांना ''पशू प्रदर्शनात देखण्या गायी बैलांना दिल्लीतील प्रदर्शनात मानसन्मान मिळाले आहेत. पांढर शुभ्र रंग, टोकदार शिंगे, लांबट शेपूट, मवाट कातन आणि लांबवार खोंड विलक्षण

सुंदर दिसतो. म्हणूनच पूर्वी ही देखणी जनावरे चोरण्यासाठी पेंढारी लोक येत असत. त्याच्याबरोबर लढाईत कामी आलेल्या लोकांची आठवण 'विरगळ' च्या रुपाने आज दिसून येते.''[८]

खिलार जातिवंत व कष्टाळू बैलांविषयी कृष्णा इंगोले म्हणतात, ''दारात रूबाबदार बैल असले की शेतकऱ्याला आकाश ठेंगणे वाटते.''[९] माणदेशाचे भूषण असणारी ही खिलार जनावरे आता कमी होऊ लागली आहेत. खिलार गायीचा भाकड काळ अधिक असतो. तसेच त्या गायीचे दूध फार कमी असते म्हणून त्या पाळण्याचे प्रमाण फार कमी झालेले आहे. बैलांकडून सावकाश शेती करून घ्यायला कोणालाही वेळ नसतो. प्रत्येकजण यंत्राने लवकर कामे करून घेण्याच्या नादात असतो. परिणामी खिलार जनावरांची मागणी प्रचंड घटली आहे. वेळीच उपाय केले नाहीत तर ही जनावरे पडद्याआड जाण्याची शक्यता अधिक आहे.

**२.३.२ दुष्काळी प्रदेश :-** माणदेशात दुष्काळाची फार मोठी समस्या आहे. दरवर्षी पावसाचे प्रमाण अत्यंत कमी असते. तर एखाद्या वर्षी पाऊस पडतच नाही. अशावेळी माणदेशात दुष्काळ पडतो. येथे प्रत्येक तीन वर्षातून एकदा तरी दुष्काळ असतो. हा येथील जनतेचा अनुभव आहे. त्यामुळे येथील लोकांना मूलभूत गरजांसाठी भटकंती करावी लागते. दुष्काळाविषयी कृष्णा इंगोले म्हणतात, ''पाण्याचा प्रश्न हा माणदेशाच्या दु:खाचे मूळ आहे. माणदेश दुष्काळी आहे, गरीब आणि मागसलेला आहे. याचे प्रमुख कारण पाण्याचा अभाव हे आहे.''[१०]

माणदेशात वारंवार दुष्काळ पडतो. आजच नव्हे तर प्राचीन काळापासून येथे दुष्काळ पडले आहेत. म्हणून दुष्काळ हा माणदेशाच्या पाचविलाच पुजलेला आहे. दुष्काळ म्हणजे सरासरी पाऊसमानाच्या ७५ टक्क्यापेक्षा कमी पाऊस असणे. अगोदरच माणदेशातील जमिनीची जलसंधारण क्षमता अत्यंत कमी आहे. त्यातच पाऊसमान कमी झाल्यामुळे पिकांच्या वाढीसाठी आवश्यक तो ओलावा जमिनीत टिकून राहत नाही. भूजलाची पातळी खाली जाते. पाण्याची टंचाई निर्माण होऊन शेतीपूरक व्यवसायाची उत्पादन क्षमता घटते. पिण्याचे पाणी, चारा, रोजगार, अन्नधान्य टंचाई निर्माण होते. सर्वात मोठी झळ शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी जनतेला पोहचते. ''दुष्काळामध्ये लोक हवालदिल झाले. हाती आलेले अपुरे धान्य हा: हा: म्हणता उडाले आणि कळणा कोंडा खाऊन राहण्याची पाळी आली. पुढच्या पिकांची आशा धरून शेतकरी राहिले, पण ज्यांची पोटे हातावरची असे गोरगरीब गाव सोडून जगायला गेले. गावातल्या बऱ्याच घरांना कुलपे लागली.''[११] अशी दुष्काळी परिस्थिती माणदेशात वारंवार निर्माण होते. तिचा गांभिर्याने विचार केला जात नाही. दुष्काळी परिस्थितीला तोंड देण्यास आपण असमर्थ ठरतो. म्हणूनच दुष्काळाची झळ जनसामान्यांच्या हजारो संसारांना पोहचते.

**२.३.३ शेळ्या मेंढ्या पालन :-** खिलार जनावरासोबत म्हैशी पाळणे, कोंबड्या पाळणे आणि शेळ्या-मेढ्या पाळणे हे माणदेशाचे वैशिष्ट्य आहे. या प्रदेशात शेळ्या-मेंढ्यांचे पालन धनगर समाज करतो. माणदेशात धनगर समाज ५३% इतका आहे. हे धनगर द्रविड वंशातील आहेत. कानडी भाषेत 'दनगार' असे म्हटले जाते. 'दन' म्हणजे गुरे-ढोरे, शेळ्या-मेंढ्या होय. त्यापासून धनगर हा शब्द प्रचलित झाला आहे.

माणदेशात खुरट्या वनस्पती अधिक आहेत. मुरमुळी, बोरी, बाभळी, केकत नपत देवबाभळ अशी झाडे-झुडपे तर पाऊस पडल्यानंतर उगवणाऱ्या छोट्या छोट्या वनस्पती हे या शेळ्या-मेंढ्यांचे अन्न असते. पिक काढल्यानंतर मोकळ्या जमिनीतील धसकटे, गवत, पालापाचोळा खाऊन ती जनावरे जगू शकतात. माणदेशात या प्राण्यांसाठी चांगले हवामान असल्यामुळे जनावरांची वाढ चांगली होते. माणदेशातील या जनावरांना मांसासाठी मागणी आहे. मांस चवदार व रुचकर असल्याने शेळ्या, मेंढ्या यांचे बाजार दिवसेंदिवस मोठमोठे भरत आहेत. त्यांच्या फायद्याविषयी सयाजीराजे मोकाशी म्हणतात, ''मेंढ्यांची लोकर, कातडी, दूध व खत यांस चांगली किंमत मिळत असल्याने शेती व्यवसायात चांगला पर्याय म्हणून योग्य प्रमाणात हा व्यवसाय केला जातो. प्रत्येक घरात शेळ्या पहावयास मिळतात. शेतमजूर व शेतकऱ्यांकडे हमखास ही लहान जनावेर असतात. गरीबांची गाय म्हणून शेळीकडे पाहिले जाते. ती बहूगुणी आहे.''[१२]

शेळ्या मेंढ्या यांच्या बाजाराविषयी आणि अशिक्षित शेकऱ्यांच्या पिळवणुकीविषयी, लोकरीच्या बाजारभावाविषयी कृष्णा इंगोले म्हणतात, ''लोकरीला योग्य भाव मिळत नाही. लोकर व्यापारी अशिक्षित मेंढपाळांची अक्षरश: लुबाडणुक करतात. कापसाप्रमाणे लोकरही सरकारने एकाधिकार हमी किंमतीला खरेदी केली पाहिजे.''[१३] अशाप्रकारे माणदेशातील शेतकऱ्यांना सरकारने दिलासा दिला.

**२.३.४ सहनशील, सोशिक जनता :-** माणदेशातील सर्वात मोठा प्रश्न म्हणजे अज्ञान होय. माणदेशात अजूनही सुमारे ५५% लोक निरक्षर आहेत. या अज्ञानाचा भस्मासूर माणदेशातील सर्व विकास व योजनांची फळे खाऊन टाकतो. अज्ञानामुळे त्यांच्यात एकजूट होत नाही. माणदेशात अनेकविध जातीचे, धर्माचे, पंथाचे व विचारांचे लोक राहतात. प्रत्येकास खडतर जीवनास सामोरे जावे लागते.

उद्याचा दिवस कसा येईल हे माहित नसल्याने त्याची मानसिक पूर्वतयारी प्रत्येकालाच करावी लागते. परिस्थितीला शरण जाणे भाग असते. समृद्धीच्या काळात आपण खुप उधळ-माधळ केल्यास ते आपणास फेडावे लागेल. असे प्रत्येकाच्यामनात येते. त्यातूनच संयमाने जगण्याचे सूत्र त्यांना सापडलेले

दिसते. त्यासाठी संयम हा विवेकशील विचार लाखमोलाचा असतो. यादृष्टीने माणदेशी लोक संयमी, अल्पसंतुष्ट परंतु विचारपूर्वक आपले जीवन जगताना दिसतात. कोणत्याही दिखाव्याच्या आहारी न जाता जे असेल त्यात आनंद वाटून घेणे ही सामाजिक सहनशीलता लक्षणीय आहे.

त्यांच्या परिस्थितीविषयी सयाजीराजे मोकाशी म्हणतात, "महाराष्ट्रात अनेक भागात शेतकरी आत्महत्या करताना दिसतात. परंतु माणदेशात तसे घडत नाही. परिस्थिती अनुरूप जीवनाशी झगडण्याची क्षमता त्यांच्यात आलेली असते. अत्यंत चिकटपणे व जिवंतपणे आपण जगले पाहिजे असेच त्यांना नेहमी वाटत आले आहे."[१४]

**२.३.५ वैशिष्ट्यपूर्ण निसर्ग :-** पूर्वी प्राचीन काळी हा दंड करण्याचा भाग होता. निबिड अरण्य आणि प्राणी मात्र यांच्या संगतीत मानव त्या काळात आनंदाने राहत होता. अनेक वर्षापासून पाऊसमान कमी होत असल्याने नेहमी दुष्काळी परिस्थिती, सदैव पाणीटंचाई, उघडी बोडकी माळराने, शुष्क वनस्पती इ. गोष्टी माणदेशात आढळतात. एखाद्या आदिवासी भागापेक्षाही अधिक मागास माणदेश असावा असे वाटते. आदिवासी प्रदेशात आदिवासींना निदान शिकार, फळे, मध, लाकुडफाटा तरी मिळत असेल.

सदैव दुष्काळामुळे वनस्पती हळूहळू नाहीशा होत आहेत. राहिलेल्या बोरी, बाभळी चिवट असल्याने जतन झाल्या आहेत. त्यांच्या जीवावर अनेक लोक जगू लागले आहेत. पाण्याची पातळी दर दिवसाला खालावत चालली असल्याने पाण्याशिवाय मोठे वृक्ष, नारळी ही झाडे संपत निघाली आहेत.

माणदेशात अथांग माळरानातील निसर्ग पहावयास मिळतो. अफाट पसरलेले डोंगर व टेकड्या दिसतात. विविध भागात एकाच देवबाभळ स्वरूपाची पिकांची नुकसान करणारी झाडे, दुष्काळात करपून गेलेली पिके, मुरमाड तांबड्या जमिनी, पावसाच्या आशेवर खिलार बैलाकडून शेतीची चाललेली मेहनत अशा प्रकारचे निसर्ग माणदेशात पहावयास मिळतात.

या निसर्गाविषयी सयाजीराजे मोकाशी म्हणतात, "माणदेशाच्या प्रादेशिकतेचा विचार केल्यास निसर्ग हे येथील महत्त्वाचे लक्षण ठरते. भौगोलिकदृष्ट्या हा प्रदेश इतरांहून भिन्न असल्याने येथील हवामान, डोंगर, पर्वत, टेकड्या, नद्या-नाले, झाडे-झुडपे, पशु-पक्षी सरपटणारे प्राणी, जीवजंतू या सर्वांचा समावेश वैशिष्ट्यपूर्ण निसर्गात होतो."[१५]मानवी जीवनात निसर्गाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. मानवी जीवन फुलते, बहरते ते निसर्गावरच आणि त्याच्यावरच मानवी जीवाचे भवितव्य अवलंबून आहे.

**२.३.६ स्थलांतर :-** माणदेश हा मुळात निसर्गाच्या अवकृपेचा प्रदेश असल्याने तेथील लोकांना, जनावरांना, पशु-पक्षांना, भिक्षेकऱ्यांनाही परमुलखात गेल्याशिवाय जीवन जगणे अवघड होऊन बसते. सगळ्यांच्या पोटासाठी लागणारे अन्न जमिनीतच पिकते. जर पाऊस पडला नाही तर नाईलाजाने लोकांना स्थलांतर करावे लागते. माणदेशातील जगणे खडतर, कष्टाचे, दु:खाचे, दैन्याचे व मोठ्या संकटाचे आहे. हे मात्र खरे! माणदेशातील शेतकरी किंवा सामान्य माणूस जगण्यासाठी खुप आटापिटा करताना दिसतो. अगदी इलाज नसेल त्या वेळेला कुटूंब व जनावरे यांच्यासह तो स्थलांतर करतो. इथला दुष्काळ त्याच्या पाचवीलाच पुजलेला असल्याने पहिल्यांदा जनावरे जगली पाहिजेत. म्हणजेच आपण जगू असे त्यांना वाटते. त्यामुळे दुष्काळ पडल्यावर लहान-मोठी जनावरे जगविण्यासाठी नदीकाठी घेऊन जाणे क्रमप्राप्त ठरते. ऊसतोडीसाठी जाताना शेतमजूर आपल्या जनावरांना बरोबर घेऊन जातात. धनगर लोक शेळ्या-मेंढ्या घेऊन दरवर्षी कोकणात जातात. कोकणात पाऊस सुरू होताच माणदेशात येतात.

माणदेशातील अनेक लोक गलई व्यवसायात आहेत तर काही अल्पशिक्षित लोक शहराच्या ठिकाणी माथाडी गिरणी कामगार, कंपनी, कारखाने येथे काम करतात. नाहीतर चालक व्यवसायानिमित्त स्थलांतर करतात. ''सुशिक्षित बेकारांची संख्या वाढू लागली आहे. त्यांनाही नाईलाजाने परप्रांतात नोकरीसाठी जावे लागले. याशिवाय डॉक्टर, वकील, इंजिनिअर, चित्रकार, कलावंत, गायक, लेखक इ. अनेकांना सुसंधीसाठी परभागातच जाऊन आपले नशीब अजमवावे लागते. माणदेशी मेंदू तल्लख आहे. पण त्याचे चीज माणदेशात होत नाही हे खरे.''[१६] असे सुशिक्षितांच्या स्थलांतराविषयी मोकाशी म्हणतात.

**२.३.७ नव्या फळबागा :-** माणदेशात अलीकडे बोर डाळिंब यासारख्या फळबागांचा विकास फार मोठ्या प्रमाणावर होत आहे. सांगोला तालुक्यातील जाणकार शेतकऱ्यांनी १९८० साली डाळिंबीच्या बागा घेण्यास सुरुवात केली. सांगोला पाठोपाठ जत व आटपाडीचे शेतकरीही अशा प्रकारची फळबागांची लागवड करु लागले आहेत. माणदेशी डाळिंब हे देशभर दर्जेदार म्हणून प्रसिद्ध झाले आहे. या शिवाय सीताफळ व चिक्कू लागवडीही मोठ्या प्रमाणात होऊ लागली आहे. माणदेशामध्ये सध्या जवळजवळ ४००० एकर डाळिंब क्षेत्र आहे.

माणदेशातील हवामान फळबागांसाठी अत्यंत पोषक आहे. शेतकरी वर्गाला त्याची जाणीव करुन देऊन मोठ्या प्रमाणावर विविध प्रकारच्या फळबागा विकसित झाल्या तर माणदेशी शेतकऱ्यांची पारंपरिक भुसार धान्य पिकविण्याची पद्धती बदलून सतत तोटयात जाणारी शेती थोडीशी किफायतशीर झाल्याचे चित्र निर्माण होईल.

माणदेशातील फळबागेविषयी कृष्णा इंगोले म्हणतात, ''शेतकऱ्याला फळबागेची माहिती व ज्ञान सहज उपलब्ध होऊ शकत नाही. त्यासाठी राहुरी कृषी विद्यापीठाची एक 'फळबाग विकास केंद्र' सांगोला तालुक्यात होण्याची नितांत गरज आहे. त्यामुळे येथे विकसित होत असलेल्या फळबागांना शास्त्रीय अभ्यासाची व संशोधनाची जोड मिळेल. माणदेशाचे चित्र बदलून त्याची स्वित्झर्लंड व्हायला वेळ लागणार नाही.''[१७] नवीन फळबागा विकासासाठी सरकारने पुढाकार घेऊन माणदेशातील शेतकऱ्यांना मदत केली पाहिजे.

**२.३.८ गोपालांचा प्रदेश :-** माणदेशात खिलार गायींचे पालन फार मोठ्या प्रमाणावर केले जाते. खिलार गायी दारात असणे हे प्रतिष्ठेचे लक्षण मानले जाते. माणदेशात प्रत्येक घरासमोर एकतरी गाय असतेच. त्या गायीची दररोज पूजा करणारे लोक माणदेशात आहेत.गाय आणि माय समान मानून संभाळले जाते. गायीच्या पोटात ३३ कोटी देव असतात अशा समजुतीतून तिचा सांभाळ केला जातो. तिला कोणीही विकत नाही. तर ती दुसऱ्याला सांभाळायला दिली जाते. तिचा उपयोग फक्त खोंड व बैल उत्पत्तीसाठी केला जातो. एखाद्या गायीला तीन-चारखोंड झाले तर ते घर वर येऊ शकते असा येथील जनतेचा अनुभव आहे.

या गायी बैलाइतक्याच सुंदर असतात. पण त्यांचा दुधासाठी फारसा उपयोग केला जात नाही. तिचा भाकडकाळही फार लांब असतो. खिलार जनावरांची वैशिष्ट्ये कायम ठेऊन संकरित व अधिक उत्पादन देणाऱ्या गायींचे प्रमाण वाढविले पाहिजे. खिलार जनावरातील सर्व गुण कायम ठेऊन तिच्या दोन वेतातील अंतर कमी करुन दुधात वाढ करणारे क्रॉस ब्रीड करता येणार नाही का ? या दिशेने संशोधन व प्रयोग व्हायला हवेत.

**२.३.९ शेतमजुरांची मोठी संख्या :-** माणदेश हा दुष्काळग्रस्त भाग असल्याने कामकरी शेतमजुरांची संख्या फार मोठ्या प्रमाणावर आहे. शिक्षणा अभावी हे लोक शेतमजूरीकडे वळलेले पहावयास मिळतात. शेतीच्या हलाखीच्या परिस्थितीमुळे छोटा शेतकरी व भूमिहीन शेतमजुरांची संख्या खुप मोठी आहे. काही वेळेस हा शेतमजूर शेतीतील हंगामी कामासाठी स्थलांतर करताना दिसतो. ही कामे म्हणजे ऊस तोडणी, कापूस वेचण्यासाठी, गोव्यातील खाणीत, दुष्काळी काम, रस्त्यावरील काम इ. कामे असतात. अशा कामातूनही त्याला पोटभर अन्न मिळत नसेल तर तो वाईट मार्गाला लागतो.

**२.३.१० देव-देवता आणि संत :-** माणदेशी माणूस हा देवभोळा आहे. माणदेशाची भूमी देवदेवतांची आहे. माणदेशामध्ये राहणारी जनता मागासलेली आहे. प्रत्येक गावात मारुती, मरिआई, म्हसोबा, सिदोबा, खंडोबा, नाचबाय, यासारखी ग्रामदैवत आहेत. त्याच्यावरील लोकश्रद्धेमुळे छोट्या मोठ्या

जत्राही करतात. या प्रदेशाबाहेरील पंढरपूरचा विठ्ठल, कोल्हापूरचा जोतिबा, जेजूरीचा खंडोबा, तुळजापूरजी भवानी, चिंचणीची मायाक्का या देवतांना मोठ्या प्रमाणावर माणवासी असतो. त्यांच्या यात्रांना जातात. गावोगावी त्या देवांच्या नावाची मंडळे आहेत. तर विठ्ठलाची भजनी मंडळे गावोगावी पहावयास मिळतात.

देव-देवतांशिवाय माणदेशामध्ये संतांनाही विशेष महत्त्व आहे. ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, जनाबाई, मुक्ताबाई, चोखामेळा, सावतामाळी, रामदास यांच्याशिवाय माणदेशातील काही संत किंवा स्वामी आहेत. रंगनाथ स्वामी निगडीकर, ब्रह्माजीपंत नाजरेकर, श्रीधरस्वामी नाजरेकर, ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज, संजीवास्वामी महाराज, इचगिरी संप्रदायातील शिवलिंग व्याअक्का, सांगोल्याचा राणोजी बुवा, विसूरचे विष्णू महाराज, खर्डीचे सीमाराम महाराज इ. आहेत.

**२.३.११ अज्ञान रूढी परंपरा :-** माणदेशामध्ये शिक्षणाचा अभाव असल्याने येथील जनता अज्ञानी आहे. रुढी, परंपरा व चालीरितीने ग्रासलेली आहे. अंधश्रद्धा न पाळणारा एखादाही माणूस येथे सापडणार नाही. अज्ञानामुळे रुढी, परंपरा व अंधश्रद्धेसाठी प्रचंड प्रमाणात खर्च करणारे लोक माणदेशामध्ये आहेत.

माणदेशात बऱ्याच अंधश्रद्धा पाळल्या जातात. अंगात येणे, देवऋषीकडून आजार बरा करणे, भोंदू बुवाकडे जाणे, एखाद्या आजारावर लिंबू किंवा दामटा उतरुन टाकणे. चेंगदुळी पितरे सारखी दैवी शक्ती अन्न व धान्य लंपास करताना दिसतात, मूठ मारुन एखाद्याचा प्राण घेतला जातो. एखाद्याला पितरे किंवा करणीच्या सहाय्याने आजारी पाडता येते, करणी करुन दुभती गाय आटवली जाते, भानामतीने आजार नाहीसा केला जाते. अशा कितीतरी माणदेशातील अंधश्रद्धा सांगता येतील.

**२.३.१२ वैशिष्ट्यपूर्ण जाती जमाती :-** माणदेशामध्ये विविध जातीधर्माचे लोक मिळून मिसळून गुण्या-गोविंदाने राहतात. माणदेशामध्ये केव्हाही जातीय दंगल झालेली नाही असा आजपर्यंतचा इतिहास सांगतो. येथे जातीय अस्पृश्यता पाळली जात नाही. येथील सर्वसाधारण लोकांच्यामध्ये भेदभाव न करता एकजुटीने राहण्याचे प्रमाण अधिक आहे.

माणदेशामध्ये ब्राह्मण व पुरोहित हा वर्ग श्रेष्ठ मानला जातो. त्यांच्याकडे पुजापाठ वाचण्याचे काम असते. लोक त्यांना दक्षिणा देतात. लिंगायत, मारवाडी आणि जैन लोक येथे व्यापारी व्यवसायात आहेत. येथे बहुसंख्येने आढळणारा मराठा कुणबी हा शेती व्यवसाय करतो. धनगर समाज शेळ्या-मेंढया पालनाचा व्यवसाय करतो. प्रत्येक गावात बारा बलुतेदार आहेत. त्यामध्ये सुतार, लोहार, कुंभार, परिट, न्हावी, चांभार, मांग यांचा समावेश होतो. प्रत्येक गावात दलितांची संख्या लक्षणीय आहे. गुन्हेगार म्हणून समजल्या गेलेल्या रामोशी, बेरड, लमाण, फासेपारधी यांचाही सहवास माणदेशात आढळतो.

कृष्णा इंगोले यांना अभिप्रेत असलेली जातीव्यवस्था पुढीलप्रमाणे सांगता येईल. ''हिंदू समाजातील जाती जमातींचा विचार करण्याचे खरे म्हणजे आज कारण नाही. जाती-भेद विरहित समाजाची निर्मिती झाली पाहिजे यात वाद नाही पण वस्तुस्थिती तशी नाही.''[१८] त्यांना जाती व धर्म विरहित असलेली समाजव्यवस्था अभिप्रेत आहे की जी एकजुटीने व आनंदाने माणदेशात वास्तव्य करेल.

**२.३.१३ माणदेशी वैशिष्ट्यपूर्ण बोली :-** माणदेशात बोलली जाणारी बोली मराठी साहित्याच्या प्रांगणात एक वेगळीच छाप पाडते. ती भाषा ही ग्रामीण स्वरूपाची आहे तर गावंढळ स्वरूपाची भाषा माणदेशात बोलली जाते. या बोलीच्या थोड्याशा शब्दातून अधिक अर्थ स्पष्ट करण्याचे सामर्थ्य या बोलीमध्ये आहे. माणदेशातील लोकांच्या तोंडी वाक्प्रचार, म्हणी व उपमा सहज घोळतात. सर्व सामान्यांच्या मनावर व जीवनावर परिणाम करणारे सुविचार या बोलीत आढळतात. अलंकार व उपमा यांचीही सरमिसळ माणदेशी बोलीमध्ये दिसून येते. अस्सल माणदेशी असणारे वाक्प्रचार, भावनेच्या उत्कटतेतून तयार झालेल्या म्हणी माणदेशी बोली वेगळी असल्याचे सूचित करताना दिसते. माणदेशी बोली ही प्रमाण भाषेच्या थोडीशी जवळ जाणारी भाषा आहे.

**२.३.१४ ग्रामविशेष :-** माणदेशातील प्रत्येक गावचे वेगळेपण नजरेत भरते. त्यावर त्या गावाची प्रतिष्ठा व ओळख अवलंबून असते. विशिष्ट प्रकारची नैसर्गिक रचना, डोंगराळ प्रदेश, विशिष्ट प्रकारची झाडी, एखादा प्राणी, जमिनीचा प्रकार यातून तो गाव प्रकाशझोतात येताना दिसतो. वाढत जाणारा दुष्काळ, माणदेशी लोककला आणि लोकसाहित्य, डफडे पिपाणीचा गजर, यासारखी आणखी काही माणदेशी वैशिष्ट्ये सांगता येतील.

आपला देश स्वतंत्र होऊन साठ वर्षे झाली तरीही लोकशाही राजवटीतून फारसा विकास झाला नाही. येथील शेकडो वर्षाचा दुष्काळ दिवसेंदिवस वाढतच निघाला आहे. येथे राहणारी जनता केवळ 'जीवनभोग' म्हणून दिवस ढकलत आहे. परंतु इतक्या वर्षाच्या स्वातंत्र्यातील एकाही राजवटीला माणदेशाचा विकास व्हावा असे वाटले नाही. माणदेशातील विकासातील अडसर म्हणजे नेतृत्व होय. माण व जत हे दोन तालुके कायम राखीव आहेत. मंगळवेढा व आटपाडीमध्ये बदलते नेतृत्व आहे. सांगोला कायम विरोधकांकडे तर कवठेमहंकाळकडे दुर्लक्ष. यातून या भागाच्या विकासाला खीळ बसली आहे. मूलभूत गरजांचीही या प्रदेशात वानवा आहे. म्हणून माणदेश समस्या पिकविणारा प्रदेश आहे असे वाटते.

## २.४ माणदेशाचे साहित्य - परंपरा : -

पिढ्यान् पिढ्या दुष्काळात मागासलेला माणदेश मात्र काही बाबतीत ताजातवाना असलेला आपणास पहावयास मिळतो. साहित्याच्या प्रांगणात मात्र माणदेशात केव्हाच दुष्काळ असलेला दिसत नाही. तेथे सर्व काळ सुकाळ असलेला पहावयास मिळतो. येथील साहित्य संपन्न प्रदेश आहे. हा सातासमुद्रा पलिकडे वाचकांना माहित झाला आहे. ऐवढे मोठेपण माणदेशातील साहित्य संपन्नतेच आहे. अशा माणदेशातील साहित्यांचा आणि साहित्यिकांचा परामर्श घेऊ.

साहित्य म्हणजे काय ? हे सांगातना वासुदेव मुलाटे 'ग्रामीण कथा : स्वरूप आणि विकास' या ग्रंथामध्ये म्हणतात, ''लेखक-कवी यांच्या मनात निर्माण होणारी विविध विचार वलये, ताण, तणाव, आंदोलने, अस्वस्थता यांचा त्याने प्रभावी व अनुरूप शब्दात, भाषेत निर्माण केलेला रचनाबंध, अभिव्यक्ती म्हणजे साहित्य होय.''[१९] अशा साहित्याला लावलेले प्रादेशिक हे विशेष नुसते स्थळ काळाचे निदर्शक नसते विशिष्ट अशा ग्राम जाणीवांचा ते निर्देश करणारे असते. आशयाला येथे विशेष प्राधान्य असते.

माणदेशी लेखक द. ता. भोसले म्हणतात, ''लेखकाची ग्रामीणतेविषयीची जाणीव, ग्रामीण हेतू कल्पना, कृषिसंस्कृतीच्या केंद्रस्थानी जोडलेले अनुभव, ग्रामीण बोलीचा माध्यम म्हणून वापर आणि ग्रामीणतेचे संस्कार घेऊन घडलेले लेखकाचे व्यक्तिमत्व यातून ग्रामीण साहित्याची निर्मिती होते.''[२०] द. ता. भोसले यांच्यामते कृषिकेंद्रीत अनुभव ग्रामीण भाषेत जोडणे म्हणजे साहित्य होय.

माणदेशी साहित्य कसे असते याविषयी कृष्णा इंगोले सांगतात, ''प्रादेशिक पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या साहित्यात विशिष्ट भौगोलिक प्रदेश त्या कलाकृतीचा अविभाज्य घटक असतो. लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडणही त्या प्रादेशिक वातावरणात झालेली असते. त्यांच्या साहित्य निर्मितीच्या प्रेरणाही सभोवतालच्या जीवनात शोधता येतात. तसेच अशा वाङ्मयात त्या प्रादेशिक जीवनाचे प्रतिबिंब प्रकर्षाने पडलेले असते.''[२१] अशा प्रकारे माणदेशी साहित्य हे सभोवतालच्या नैसर्गिक परिस्थितीतून प्रत्ययास आलेले असते. त्यामध्ये समाजजीवनातील जीवन अनुभव प्रतिबिंबित होताना दिसतात.

माणदेशी साहित्याचा विचार करताना प्रथम मध्ययुगीन साहित्याचा विचार करणे गरजेचे ठरते. त्यानुसार माणदेशातील प्रथम लेखक म्हणून रंगनाथ स्वामी निगडकर यांच्याकडे पाहिले जाते. हे दास पंचायतनातील एक अधिकारी पुरुष होते. त्यानी 'योग व शिष्ठ सार टीका' हा ग्रंथ लिहिला. याशिवाय 'गजेंद्र मोक्ष', 'सुदाम चरित्र', 'शुकरंभा संवाद' इ. १६ ग्रंथ, पदे, अभंग, श्लोक लिहिले. ते पंडीत कवी श्रीधरपंत नाझरेकर यांचे चुलत चलुते होते.

बह्माजीपंत नाझरेकर यांनी 'आत्म प्रकाश' हा ग्रंथ लिहिला. त्यांचे पुत्र श्रीधरपंत नाझरेकरांनी मात्र सुबोध व रसाळ शैलीतून मराठी माणसाच्या हृदयात घर केले. 'हरिविजय', 'रामविजय', 'वेदांत सूर्य', 'पांडव प्रताप', 'शिवलिलामृत' असे अनेक ग्रंथ लिहिले. सहजानंद, दत्तानंद, बह्मानंद ह्यांनी आनंद संप्रदायाची गुरूपरंपरा पुढे चालविली.

रामनामाचा सोपा मंत्र देऊन ब्रह्मचैतन्याची अनुभूती जनसामान्यांना देणारे गोंदवले बु॥ गावचे ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज माणदेशातील सर्वश्रेष्ठ साधुपुरुष होत. त्यांनी केलेली प्रवचने, पदे, श्लोक व आरत्या भक्तगणात प्रसिद्ध आहेत.

श्रीमंत भगवानराव पंतप्रतिनिधी औंधकर यांची उपराजधानी आटपाडी ही होती. १९३५ साली इंदूर येथे भरलेल्या 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे' ते अध्यक्ष होते. ते प्रामुख्याने चित्रकार होते. व्यायामपटूंचे काही मोजके ग्रंथ त्यांनी लिहिले.

मराठी साहित्य शारदेचे अभिजात कवी आधुनिक महाराष्ट्राचे वाल्मीकी, शाहीर, अभिनेत, चित्रपट कथा, पटकथा संवाद व गीत लेखक आणि विविध वाङ्मय प्रकार सहजतेने हाताळणारे अलौकिक प्रतिभावान साहित्यकार गजानन दिगंबर माडगूळकर (जन्म १/१०/१९१९ - मृत्यू १४/१२/१९७७) यवतमाळ येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. 'गीतरामायण', 'चैत्रबन', 'जोगिया', 'पूरिया', 'वैशाखी', 'गीत गोपाळ' हे काव्य. 'चंदनी उदबत्ती', 'बांधावरच्या बाभळी', 'भाताचे फूल', 'कृष्णाची करंगळी' इ. कथा. 'मंतरलेले दिवस', 'वाटेवरल्या सावल्या', 'तीळ-तांदूळ' या आत्मकथा याशिवाय कादंबरी नाटक चित्रपट कथा व गीते त्यांनी लिहिली. शाहीर रामजोशी, 'पुढचं पाऊल', 'लाखाची गोष्ट', 'प्रपंच', 'जगाच्या पाठीवर', 'संथ वाहते कृष्णामाई' हे मराठी. तर 'दो आँखे बारह हाथ', 'गुँज उठी शहनाई', 'नवरंग', 'तुफान और दिया' हे हिंदी चित्रपट लोकप्रिय ठरले. 'स्वातंत्र्योत्तर कविता' या लेखात रवींद्र घवी ग.दि. मां.विषयी म्हणतात, ''ग. दि. माडगूळकरांचे 'गीत रामायण' १९५६ हे या काळातील सर्वात लोकप्रिय काव्य म्हणावे लागेल. मराठी रसिकांनी 'आधुनिक वाल्मीकी' हा किताब माडगूळकरांनाच बहाल केला आहे.''[२३] माडगूळकरांचा 'गीत रामायण' चा मराठी रसिकांवर फारच खोल प्रभाव पडलेला दिसून येतो.

दलित जीवनाचे भाष्यकार आणि मराठीतील सुप्रसिद्ध कथाकार शंकरराव रामजी खरात (जन्म १७/७/१९२१ - मृत्यू ९/४/२००१) १९८४ साली जळगाव येथे भरलेल्या 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे' ते पहिले दलित लेखक अध्यक्ष होत. 'सांगावा', 'दौंडी', 'टिटवीचा फेरा', 'बारा बलुतेदार', 'तडीपार', 'आडगांवचे पाणी' हे कथासंग्रह तर 'झोडपट्टी', 'मी मुक्त', 'टाऊट',

'मी माझ्या गावाच्या शोधात', 'गावचा टिनोपाल गुरुजी', 'हातभट्टी', या कादंबऱ्या दलित साहित्यावर व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरील वैचारिक लेखन, 'तराळ-अंतराळ' ही आत्मकथा प्रसिद्ध आहेत. १९७३ साली मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबादचे ते कुलगुरू होते. तसेच रेल्वे बोर्डाचे ते सदस्य होते.

गोमेवाडी ता. आटपाडी या खेड्यातील ऐतिहासिक कादंबरीकार नागनाथ संतराम इनामदार (जन्म २३/११/१९२९ - मृत्यू १६/१०/२००२) १९९७ साली अहमदनगर येथे झालेल्या 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे' ते अध्यक्ष होते. त्यांनी प्रामुख्याने ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या. 'झेप', 'झुंज', 'मंत्रावेगळा', 'राऊ', 'शहेनशहा', 'शिकस्त', 'राजेश्री' इ. कादंबऱ्या विशेष गाजल्या. ते मोजणी कार्यालयात अधिकारी होते. माणदेश हा त्यांचा आवडता प्रदेश असल्याने ते पर्यटनासाठी वारंवार येत असत.

अभिजात प्रतिभेचे लेणे लाभलेले कलावंत साहित्यिक व्यंकटेश दिगंबर माडगूळकर (जन्म ६/७/१९२७ - मृत्यू २८/८/२००१) अंबेजोगाई येथे पार पडलेल्या (१९२३) 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे' ते अध्यक्ष होते. माणदेशाची रेषन्‌रेष त्यांनी साहित्यातून आकारास आणली. त्यांच्या लेखनाविषयी गो. मा. पवार म्हणतात, ''माडगूळकरांच्या 'माणदेशी माणसं' या संग्रहातील कथातून प्रादेशिकतेचे वैशिष्ट्य मराठी वाचकांच्या मनावर प्रथमत:च विशेषत्वाने ठसले व त्यांच्या 'बनगरवाडी' या कादंबरीने प्रादेशिकतेची अनेकविध वैशिष्ट्ये वाचकांना प्रत्ययाला प्रथमत:च आणून दिली असे म्हटले तर ते रास्तच ठरेल.''[२३] मराठी साहित्याला एक वेगळे विश्व निर्माण करून देणारे लेखक व्यंकटेश माडगूळकर आहे. ज्यांनी प्रादेशिक साहित्याचा मापदंड निर्माण केला.

'माणदेशी माणसे', 'सत्तांतर', 'बनगरवाडी' या कलाकृती जगभरातील भाषातून प्रसिद्ध झाल्या. 'गावाकडच्या गोष्टी', 'हस्ताचा पाऊस', 'काळी आई', 'जांभळीचे दिवस', 'सीताराम एकनाथ' 'वारी', 'उंबरठा' हे कथासंग्रह. 'वावटळ', 'बनगरवाडी', 'करुणाष्टक', 'सत्तांतर', 'कोवळे दिवस' या कादंबरी लेखनातून माणदेश प्रतिबिंबीत झाला आहे. 'तू वेडा कुंभार', 'सती', 'पती गेले ग काठेवाडी', 'बिकट वाट वहिवाट', 'कुणाचा कुणाला मेळ नाही' ही नाटके तर 'कांगारुंचे चांगभले', 'नागझिरा', 'रानमेवा', 'परवचा', 'जंगलातील दिवस' अशा अनेक वैशिष्ट्यपूर्ण कलाकृती व्यंकटेश माडगूळकरांनी लिहिल्या. 'सांगते ऐका' यासारख्या अनेक चित्रपटांचे लेखन त्यांनी केले. ते मुळचे चित्रकार होते. त्यांची अनेक चित्रे आजही पहावयास मिळतात. ते पुणे आकाशवाणीत ग्रामीण कार्यक्रमाचे अधिकारी होते.

आडपाडीचे प्रसिद्ध लेखक चित्रपट दिग्दर्शक मधुकर गोपाल पाठक (जन्म ११/११/१९२९) हे होत. संत वाहते कृष्णामाई, प्रपंच, मु. पो. ढेबेवाडी इ. अनेक चित्रपटांचे त्यांनी दिग्दर्शन केले. 'झुंज', 'माणसाच्या मागावर', 'लागीर', 'अवलिया' हे कथासंग्रह. 'राजपुत्र', 'लक्ष्मी भ्रर्तार', 'वासुदेव' या कादंबऱ्या, 'गदिमांच्या सहवासात' हे चरित्र लिहिले आहे.

मुचंडी ता. जत येथील सुप्रसिद्ध लेखक भीमराव कुलकर्णी (जन्म ४/११/१९३३ - मृत्यू २७/९/१९८७) यांनी विविधांगी साहित्य लिहिले आहे. 'ओंकार', 'हरिनारायण', 'मस्तानीचा मुलगा' या कादंबऱ्या लिहिल्या. 'मुर्दाड', 'धाडस', 'पोरे झालीच पाहिजेत' हे कथासंग्रह याशिवाय मराठी व्याकरण व समीक्षाग्रंथांचे लेखन त्यांनी केले आहे. पुणे येथे त्यांनी प्राध्यापकाचे काम केले.

दशरथ तायाप्पा भोसले (जन्म ८ मे १९३६) हे सरकेली ता. पंढरपूर येथील सुप्रसिद्ध ग्रामीण लेखक आहेत. २००७ साली आटपाडी येथे भरलेल्या 'माणदेशी साहित्य संमेलनाचे' ते अध्यक्ष होते. 'येथे फुलांना मरण जन्मता', 'मी आणि माझा बाप' या कादंबऱ्या लिहिल्या आहेत. 'अन्न', 'पाळत', 'अगं अगं म्हशी', 'पाऊस', 'मनस्विनी', 'जन्म', 'खसखशीचा मळा' हे कथासंग्रह. 'पार आणि शिवार', 'संस्कृतीच्या पाऊलखुणा', 'आठवणीतले दिवस', 'चावडीवरचा दिवा' हे ललित लेखन. 'म. फुले एक चिंतन', 'जोती म्हणे', 'महाराष्ट्राचा सामाजिक सांस्कृतिक इतिहास' हे वैचारिक लेखन तर 'ग्रामीण साहित्य : एक चिंतन', 'लोकसंस्कृती : स्वरूप आणि विशेष', 'ग्रामीण बोलींचा शब्दकोश' इ. समीक्षात्मक लेखक याशिवाय काही संपादने त्यांच्या नावावर आहेत. द. ता. भोसले यांच्याविषयी रवींद्र ठाकूर म्हणतात, "यांची कादंबरी किस्से वजा असली तरी व्यक्तिरेखन आणि ग्रामीण जीवनदर्शन या दृष्टीने सरस उतरली आहे. एकूणच कादंबरीला ग्रामीण वातावरणाचा अस्सल रंग लाभला आहे."[२४] यावरूनच भोसले यांच्या लेखनाची शैली अस्सल माणदेशी असल्याचे जाणवते.

करगणी ता. आटपाडी येथील प्राथमिक शिक्षिका श्रीमती शांताबाई कांबळे या माणदेशातील पहिल्याच दलित लेखिका होत. त्याचे बालपणातील व नोकरी व्यवसायातील अनुभव त्यांनी 'माझ्या जन्माची चित्तरकथा' या दलित आत्मकथनात व्यक्त केले आहेत. 'नाजुका' ही मालिक दूरदर्शनवर लोकप्रिय झालेली होती. ती याच आत्मकथनावर आधारलेली होती.

श्रीपाद जोशी हे जत तालुक्यातील एक आदर्श शिक्षक आहेत. महाराष्ट्राचे वाल्मीकी ग. दि. माडगूळकर यांच्या साहित्यिक कार्यावर त्यांनी संशोधन केले असून 'गदिमा : चरित्र व कार्य' हा संशोधनात्मक समीक्षा ग्रंथ प्रकाशित केला आहे. त्यांचे इतर ललित लेख, स्फूट लेखन प्रसिद्ध आहे.

15402
BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

माण नदीकाठचे दिघंची गावेच बाल वाङ्मयप्रकार गोविंद गोडबोले हे माणदेशातील एका पिढीतील लेखक आहेत. त्यांनी प्रामुख्याने बाल कुमारांसाठी अनेक पुस्तके लिहिली आहेत. आकाशवाणी नागपूर केंद्रावरुन ते सेवानिवृत्त झाले.

नानासाहेब संतू झोडगे हे माडगूळे येथील दलित लेखक आहेत. 'फांजर' हे यांचे आत्मकथन वीस वर्षापूर्वी प्रकाशित झाले आहे. माणदेशातील दलित सवर्ण संबंध, सामाजिक विषमता, निसर्ग आणि बदलता माणदेश यावर चांगले भाष्य केले आहे. याशिवाय त्यांच्या काही कथा व इतर लेखन प्रसिद्ध आहे. ते सध्या मुंबई उच्च न्यायालयात वकिली करतात.

सुप्रसिद्ध कादंबरीकार उत्तम बंडू तुपे हे माणदेशालगतच्या एनकुळचे लेखक आहेत. मातंग समाजातील जीवनानुभव त्यांनी 'काट्यावरची पोटं' या आत्मकथानातून व्यक्त केला आहे. याशिवाय 'झुलवा', 'इजाळ', 'खाई', 'चिपाड' कादंबऱ्यांतून माणदेश दिसून येतो. 'आंदण' हा कथासंग्रह ग्रामीण जीवनानुभूती व्यक्त करणारा आहे. 'झुलवा' या कादंबरीचे नाटकात रुपांतर केले आहे.

कृष्णा जोतीराम इंगोले (१५/०८/१९५३) हे नराळे येथील आहेत. माणदेशातील नव्या पिढीतील कक्षा पसरलेला आहे याचा अभ्यासपूर्ण ग्रंथ म्हणजे 'माणदेश : स्वरुप व समस्या' वाचकांसमोर ठेवला. 'गावरंग' हा कथासंग्रह, 'गावगाजर', 'लोकसंस्कृतीतील स्त्री रुप' हे समीक्षा ग्रंथ, 'तुका म्हणे' हे संपादन याशिवाय ललित लेख, कथा, कविता, स्फूट लेखन प्रसिद्ध आहे.

कवी भाऊराव कणसे हे दहिवडी ता. माण येथील कलावंत साहित्यिक होत. ते बालरोगतज्ज्ञ आहेत. 'ख्यांग्याट', 'खुशीतली गाजरं', 'अशी होती माझी आई' हे कवितासंग्रह, 'बेवड' हे आत्मचरित्र तर 'सारं काही बाळासाठी' हे एक आरोग्य विषयक पुस्तक तर 'आता लग्नाला चला' हा चित्रपट इ. विविध स्वरूपी कलाकृती त्यांच्या नावावर आहेत.

अमन तांबोळी हे गोंदावले बु॥ येथील सुप्रसिद्ध कवी असून माणदेशात त्यांचे चांगला कवी म्हणून ओळखले जातात. ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांवर त्यांनी गाणी लिहिली आहेत. 'प्रारब्ध' हे नाटक प्रकाशित.

कवी ज्ञानेश्वर बडवे (जन्म ०२/०७/१९५४) हे शिखर शिंगणापूरचे कवी आहेत. शंभु महादेवावर काही गीते लिहिली आहेत. त्यांच्या 'भावफुलोरा' हा कवितासंग्रह प्रकाशित झाला आहे.

सुभाष कवडे हे माणदेशातील संस्कारात घडलेले कवी होत. 'शिवार माती' हा कवितासंग्रह माणदेशाची ओळख करून देणारा आहे. 'निरंजन', 'गंमतगाणी' या कलाकृती त्यांच्या शब्दवेड्या

व्यक्तिमत्त्वाची खरी ओळख आहे. ललित गद्य लेखन केले आहे. कवितेचे सूत्र संचालन हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य भाग ठरावा.

अजित बाबुराव वलेकर (जन्म १/६/१९५७) हे दिवड ता. माण येथील असून ग्रामीण कथाकार म्हणून प्रसिद्ध आहेत. 'गोतावळा' हा कथासंग्रह माणदेशी व्यक्तिचित्रे चित्रित करणारे आहे. तानाजीराव वाघमारे हे नाझरे गावचे कथाकार व कवी म्हणून प्रसिद्ध आहेत. 'धंगाटा' हा कथासंग्रह याशिवाय काही गेय कविता प्रकाशित आहेत. अविनाश कांबळे हे सांगोल्याचे लेखक. त्यांच्या काही कविता व ललित लेख माणदेशाचे वर्णन करतात. तर मराठीतील 'गजल' हा त्यांचा शोध प्रबंध प्रकाशित आहे.

महादेव नामदेव माने हे वाळेखिंडी ता. जत येथील आहेत. त्यांची 'प्रेमाची हाक' ही कादंबरी प्रकाशित झाली आहे. वाळेखिंडी ता. जत येथील संजय वाघमारे हे कवी असून त्यांचा 'माणुसमाया' हा कवितासंग्रह प्रकाशित झाला आहे. आटपाडी तालुक्यातील पिंपरी खुर्द गावचे शहाजीराव बलवंत यांचे 'माणमाती' हे आत्मचरित्र कोळी समाजातील दु:खांचे अनेक पदर ते व्यक्त करते.

सीताराम सावंत हे इटकी, ता. सांगोला येथील असून 'नामदार' व 'लगीन' या कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत. 'पांढर' हा कथासंग्रह प्रकाशित झाला आहे. 'माणदेशी ओव्यांचा ठेवा' हे सदर सकाळ दैनिकातून चालू होते. विविध नियतकालिकातून ते नियमित लेखन करतात.

सयाजीराजे मोकाशी शेटफळे ता. आटपाडी येथील असून ते गदिमा स्मारक समितीचे अध्यक्ष आहेत. गेली १५ वर्षे गदिमा पारावरील साहित्यिक मेळाव्याचे ते आयोजन करतात. 'सूर्याची शिखार' हा कविता संग्रह, 'पऱ्यांच्या राज्यात' बालकथा याशिवाय 'माणदेशी कथा' व 'आधुनिक मराठी गेय कविता' ही संपादने व्यावहारिक मराठी (सहकार्याने) हा ग्रंथ तसेच 'माणदेशी बोलीचा अभ्यास' हा शोध प्रबंध प्रकाशित.

ज्ञानेश डोंगरे यांचा 'पाठवणी' हा कवितासंग्रह. रमेश जावीर यांचा 'होलीया' हा कवितासंग्रह आणि 'वाजाप' हा कथासंग्रह. सुनिल दबडे यांचा 'हराटीची थूई', 'उन्हातल्या सावल्या' यासारखे कथासंग्रह प्रकाशित. लव्हकुमार मुळे यांचा 'गुलमोहर' हा कवितासंग्रह, संतोष जगतापयांचा 'रानकूस' हा कवितासंग्रह, विकुमार जाकीर यांचा 'पतीवीना सौभाग्यवती' हे नाटक, अशोक उन्हाळे यांचा 'मेंढरु', 'सासुरवाडी' यासारखे कथासंग्रह, अरुण कांबळे यांचा 'रामायणातील संस्कृती संघर्ष', महादेव बोराटे यांचा 'रानपालवी' हा कवितासंग्रह. या आणि आशा प्रकारचे विपुल लेखन करुन मराठी साहित्य समृद्ध करण्याचा प्रयत्न माणदेशातील साहित्यिकांनी केला आहे.

माणदेशाला उज्ज्वल साहित्य परंपरा आहे. वर उल्लेख केलेल्या साहित्यिकाशिवाय बरेच साहित्यिक आहेत की जे लेखन करतात पण प्रकाशझोतात नाहीत. त्यामध्ये संभाजीराव गायकवाड शेटफळे, संजय सुतार, संभाजी भोसले खवासपूर, ज्ञानेश्वर लेंडवे ओझेवाडी, शाहीर जयंत जाधव आटपाडी, शाहीर हरिभाऊ गळवे आटपाडी, शिवाजीराव बंडगर मेडशिंगी सांगोला, मालन भोसले नेलकरंजी, रघुनाथ केंगार नरवणे ता. माण, सुधीर इनामदार, साहेबराव कदम इ. लेखकांनी माणदेशाचा प्रदेश वाचकांना माहित करुन दिला आहे.

रंगनाथ स्वामी निगडीकर, श्रीधर स्वामी नाजरेकर, ग. दि. माडगूळकर, व्यंकटेश माडगूळकर, शंकरराव खरात यांच्यापासून ज्ञानेश डोंगरे, सीताराम सावंत, संजय वाघमारे या नव्या साहित्यिकांपर्यंत ही परंपरा सांगता येईल. माणदेशी साहित्याची आणि एकूणच मराठी साहित्यातील प्रादेशिक वाङ्मयाची परंपरा माडगूळकर बंधूंनी सुरू केली. हे सर्वमान्य झाले आहे.

माणदेशी साहित्य परंपरेविषयी कृष्णा इंगोले 'माणवैभव' मध्ये म्हणतात, "बदलत्या माणदेशाचे प्रश्न त्यात येतात. पण त्यांचा दर्जा अजून उंचवला पाहिजे. लेखनाचा वारसा नसणे, अनुभवाला कलात्मकतेच्या पातळीवर न हाताळणे, प्रसिद्धीची घाई करणे यामुळे नव्या लेखकाचा दर्जा उंचावत नाही. जीवनात होत असलेले गतिमान बदल लेखकाची चिंतनशीलता आकलन आणि मांडणी यामुळे काही मर्यादा पडत असल्या तरी 'माणदेश' ही साहित्यिकांची सुपिक भूमी आहे. इथले उजाड माळरान दुष्काळी प्रदेश आणि तिथल्या माणसाची वेदना हिच लेखकांना प्रेरणा देत आली आहे. म्हणून माणदेशात साहित्याची परंपरा कायम आहे असेच म्हणावे लागेल."[२५] माणदेशातील लोकांच्या सभोवतालीची परिस्थिती हीच त्यांच्या साहित्याची प्रेरणा असून अलीकडे दळणवळण, शिक्षणाचा प्रसार, आधुनिक शेती, बोर डाळिंब लागवड, दुष्काळ, पाण्याचे वाढते दुर्भिक्ष, राजकरण इ. चित्रण माणदेशी साहित्यात येऊ लागले आहे.

## २.५ सीताराम सावंत यांचा वाङ्मयीन चरित्र :-

आपल्या मनातील भाव भावना शब्द कल्लोळ अक्षरांच्या माध्यमातून कागदावर उमटविण्याचा प्रयत्न ग्रामीण भागातील लेखक सहज करू शकतात. अशा ग्रामीण भागात राहूनही सीताराम सावंत यांनी साहित्य क्षेत्रात केलेली कामगिरी कौतुकास्पद आहे. त्यांच्या कसदार लेखनाची सर्वच स्तरातून प्रशंसा केली जात आहे. सीताराम सावंत हे माणदेशी जीवन आपल्या लेखणीच्या सहाय्याने वाचकापर्यंत पोहचवित आहेत. व्यंकटेश माडगूळकर, ग. दि. माडगूळकर, शंकरराव खरात, द. ता. भोसले, ना. स. इनामदार यांच्या पावलांवर पाऊल ठेऊन सावंत यांनी लेखन केले आहे.

दहिवडी कॉलेज, दहिवडी येथील वार्षिक नियतकालिकामध्ये दिलेल्या मुलाखतीमध्ये आपल्या लेखनाच्या प्रेरणेविषयी सावंत म्हणतात, ''माणदेशातील हे तमाम पिडीत माझ्या चिंतनाचे विषय आहेत. या मातीतील माणसं मला विषय पुरवितात.''[२६] माणदेशाची परिस्थिती व तेथील लोकांना ज्या समस्यांना सामोरे जावे लागते, मातीशी जगणे भोगणे हे उघड्या डोळ्यांनी पाहिले आहे. आणि इथल्या माळरानावर, डोंगरदऱ्यातील, वाड्याखेड्यातील आणि दुष्काळात कष्ट करताना शेतकऱ्यांच्या काबाडकष्ट करणाऱ्या उपेक्षितांच्या जीवनाचे चित्रण केले आहे. शेतकऱ्यांच्या दयनीय स्थितीबद्दल सावंत यांनी लेखन केलेले आहे.

त्यांच्या लेखनाची सुरुवात त्यांनी महाराष्ट्रातील ग्रामस्वच्छता अभियानाच्या वेळी दैनिक लोकमतने विनोदी कथा लेखन स्पर्धा आयोजित केली. त्यावेळी 'निढळ' या गावची ग्रामस्वच्छता चालू होती. ही स्वच्छमा मोहिम आपल्या गावी आल्यास आपल्या गावातील लोक तिचा कसा वाईट उपयोग करतील यावर त्यांनी 'तिरफेवाडीची सफाई' ही विनोदी कथा प्रथम लिहिली.

'नामदार' ही त्यांची पहिली कादंबरी होय. त्यांनी या कादंबरीमधून माणदेशात जे राजकारण समाजकारण होते ते अतिशयोक्तीपूर्ण भाषेत वाचकासमोर ठेवले आहे. कादंबरी वाचत असताना वाचकांचे मनोरंजन व्हावे इतकाच हेतू डोळ्यासमोर ठेऊन कादंबरीकाराने लेखन केले आहे असे वाटते.

स्वप्न व सत्य यातील विसंगती लक्षात येते. छगन हा सवतीचा मुलगा त्याला गाव सोडून जाण्यास भाग पाडले जाते. तो दुसरीकडे जाऊन सरपंच होतो. आमदार होतो. नामदार होतो. मुख्यमंत्री पदाची खुर्ची जवळ आली असताना तो तिच्यावर विराजमान होऊ शकत नाही. हा नियतीचा व त्याच्या रगेल व रंगेल कर्माचा खेळ सावंत मोठ्या विविधतेतून साकार करतात.

'लगीन' ही सीताराम सावंत यांची दुसरी कादंबरी त्यामध्ये शेतकऱ्याचे दुःख व दारिद्रय समस्या यांचे चित्रण करतात. आपली पाळेमुळे ज्या मातीतील त्या मातीला लेखक विसरत नाहीत. काळ्या आईशी इमानदार राहतो. त्याचे प्रत्यंतर लगीन वाचताना येते. खेड्यातील लोकांचे मानापमान, अहंकार, इर्षा व जिव्हाळा यांचे वर्णन येते.

सदा व मीना या दोघांचे लग्न ठरते. पण अपघातात सदाचा एक डोळा जातो व ते लग्न मोडते. तेव्हा मीनाचे दुसरीकडे लग्न जमविण्याचा प्रयत्न केला जातो. पण यश येत नाही. तेव्हा संकट समयी मदत करणारा सदा दोन डोळेवाल्यापेक्षा श्रेष्ठ वाटाते व त्या दोघांचे लग्न होते. या कथानकातून शेतकऱ्याच्या समस्येचा ऊहापोह केलेला आढळून येतो.

'पांढर' हा कथासंग्रह प्रकाशित आहे. त्यामध्ये माणदेशातील शेतकरी व उपेक्षितांच्या जीवनावर १६ कथा लिहिल्या आहेत. यामध्ये 'गर्भबळी' सारखी कथा भ्रूणहत्येचा प्रश्न समोर घेऊन येणारी आहे की जी आकाशवाणी सातारा केंद्रावरुन लघुनाट्य रूपांतर झाली होती. 'गावकी' ही निवडणूकीतील राजकारणावर प्रकाश टाकते. ती 'दैनिक पुढारी'च्या 'बहार' पुरवणीत प्रकाशित झाली होती. चांगल्या घरातील स्त्रीला दुष्काळी कामावरजावे लागते याचे प्रत्यंतर देणारी 'मेंदी' ही कथा 'सकाळ' दैनिकातून प्रकाशित झाली आहे. 'चुटपूट' ही विनोदपूर्ण कथा असून ती (सातारा) 'पुढारी' आवृत्तीतून प्रकाशित झाली. सुशिक्षित बेकारांच्या मानसिकतेचे चित्रण करणारी 'जाणीव' कथा 'सकाळ' (सातारा) मधून प्रकाशित झाली. गावातील सरपंचकीच्या निवडणूकीवरुन भाऊबंदकीवर प्रकाश टाकणारी 'जय पराजय' ही कथा 'सकाळ' (सातारा) मधून प्रकाशित झाली. 'मोल' ही कथा 'पुढारी' (सातारा) आवृत्तीतून प्रकाशित झाली. 'मोह' ही 'सकाळ' (सातारा) मध्ये बालकथा म्हणून प्रकाशित झाली. तर 'शांता' ही 'अजिंक्य एक्सप्रेस' मध्ये प्रकाशित झाली.

सावंत यांच्या कथा ग्रामीण जीवनाशी संबंधित आहेत. काही कथा या मनोविश्लेषणात्मकही आहेत. या सोळा कथामधून वाचकांना वेगवेगळ्या विषयाची ओळख करुन दिली आहे. त्या कथा ग्रामीण शैलीत मांडलेल्या असल्याने वाचकांना अधिक आवडतात.

माणदेशामध्ये मौखिक परंपरेने गायल्या जाणाऱ्या जात्यावरील ओव्यांचे संकलन केले आहे. सातारा जिल्ह्यातील सकाळ आवृत्तीमधीन अंकूर पुरवणीमध्ये सावंत यांचे 'माणदेशी ओव्यांचा ठेवा' हे सदर खुप दिवस चालू होते. त्यामध्ये त्यांनी ओव्या आणि त्यांचे संक्षिप्त अर्थ दिलेले असत. तो वाचकांचा आवडता भाग होता. भाऊ-बहिणीचे प्रेम, माय-बाप-लेक यांचे प्रेम, पती-पत्नी प्रेम, लोकांना आपल्या सासुरवाडीबद्दल असणारी आपुलकी, आपला गाव कसा चांगला, देवाबद्दल आदरभाव, जास्त मुली असणाऱ्या माणसांची मानसिकता, पाऊस पडतेवेळी स्त्रीची मानसिकता, मुलगी माहेरी गेल्यानंतर तिचा होणारा मानपान यासारख्या विषयावर विविध ओव्या आहेत.

१. जवर मायबाप, तवर लोकी लाड
माय बाप माघारी, बिन आधाराची मेढ

२. पड-पडितो मेघराजा, नका करु गाजावाजा
धरती माता बोलं, आला माझा पतीराजा.

३. अल्याड नाथबाबा, पल्याड मानगंगा
नाथबाबाच्या लग्नाला, खाली उतर भोजलिंगा

४. लय झाल्या लेकी, नको म्हणून येड्या बापा
उडूनीया गेला चिमण्या-थोरड्यांचा ताफा
कसा मोकळा दिसे सोपा.

५. लूगड्या चोळीला, नाही बंधुजी रुसायची
माझ्या नानाजीची बाळ, सावली इसाव्याची
लोकाच्या बहिणीवानी, नाही मी अशाखोर
तुम्हाला बघु द्या डोळभर.

६. सासुरवाडी जातो, म्हणतो शेता जातो
आण गळ्याची फुका वाहतो.
सासुरवाडी जातो, म्हणतो जतरला
डाग लाडूचा याच्या धोतराला
सासुरवाडी जातो, म्हणतो नाही नाही
शेला पदरी पानं लई.

**समारोप :-**

माणदेश हा पश्चिम महाराष्ट्रातील विशिष्ट प्रदेश की जो पिढ्यान पिढ्या मागास राहिलेला आहे. शापित म्हणून राहिलेल्या या प्रदेशामध्ये दिसतात अथांग पसरलेली उघडी बोडकी माळराने, डोंगर दऱ्या, टेकड्या, दुष्काळी प्रदेश. येथील विकास हा फक्त कागदावरच करुन नेतेमंडळी सर्व मलिदा आपल्या घश्यात घालण्याचा प्रयत्न करतात.

सांगली, सातारा सोलापूर या तीन जिल्ह्यांच्या सीमेलगतचा प्रदेश म्हणजे येथे निसर्गाची अवकृपा झालेली आहे. 'बेसॉल्ट' नावाच्या अग्निजन्य खडकांचे प्रमाण अधिक आहे. तर येथील डोंगरांचे व कठीण खडकांचे प्रमाण अधिक आहे. तर येथील जमीन ही माळरानाची नापिक व खडकाळ ताबडतोंडी असलेली पहावयास मिळते. येथे चुकून कधीतरी पाऊस पडतो. एरवी हवामन स्वच्छ व सूर्यप्रकाश युक्त असते.

माणदेशाची तेथील लोकांच्या आणि निसर्गाच्या स्वरूपावरून काही वैशिष्ट्ये सांगता येतील. माणदेशमध्ये खिलार जनावरांचे प्रमाण लक्षणीय आहे. दुष्काळ हा येथील जनतेच्या पाचवीलाच पुजला आहे. शेळ्या मेंढ्यांचे प्रमाण येथे अधिक दिसून येते. येथील जनता सहनशील व सोशिक आहे.

इतर प्रदेशाहून येथील निसर्ग कमालीचा वेगळा आहे. दुष्काळात येथील लोक स्थलांतर करतात. अलीकडे नवनव्या फळबागा लावण्यात येवू लागल्या आहेत. येथे शेतमजूरांची संख्या लक्षणीय आहे. हे शेतकरी रूढी परंपरा व अज्ञानाने ग्रासलेली असून देव-देवता यांना मानणारी आहे. प्रत्येक जातिधर्माची बोली वेगळी असलेली दिसून येते.

श्रीधर स्वामी नाजरेकरापासून सुरू झालेली साहित्याची परंपरा माडगूळकर बंधूंकडून ज्ञानेश डोंगरे, सीताराम सावंत यांच्यापर्यंत आलेली आहे. या साहित्यिकांनी निर्माण केलेल्या कलाकृती सातासमुद्रा पलीकडे अजरामर ठरलेल्या आहेत.

तर सीताराम सावंत यांनी घेतलेली साहित्य क्षेतातील मराठी लक्षणीय आहे. त्यांनी आपला प्रदेश आपल्या लेखनीने सर्व वाचकांना माहिती करुन दिला आहे. माणदेशातील त्यांचा एक विशेष वाचकवर्ग तयार झाला आहे. साहित्याच्या क्षेत्रातील त्यांचे कार्य उल्लेखनीय म्हणावे लागेल.

## संदर्भ सूची


१. मोकाशी, सयाजीराजे : 'माणमाती',
साप्ताहिक संपादकीय, 'माणदेशाचे निराळेपण',
आवृत्ती - १७/०८/२००७ पृ.क्र.२

२. विंगकर, आनंद : 'शब्दवेध', मासिक ,
जानेवारी २००८, ३३ अंक पृ. क्र. ३९.

३. इंगोले, कृष्णा : 'माणदेश : स्वरूप आणि समस्या',
माणगंगा प्रकाशन कमलापूर (सांगोले)
प्रथमावृत्ती - १९८८, पृ. क्र. १

४. तत्रैव : पृ. क्र. १.

५. तत्रैव : पृ. क्र. २.

६. तत्रैव : पृ. क्र. ७.

७. भोसले, द. ता. : प्रस्तावना 'माणदेश : स्वरूप आणि समस्या',
माणगंगा प्रकाशन, कमलापूर (सांगोले),
प्रथमावृत्ती - १९८८, पृ. क्र. ३.

८. मोकाशी, सयाजीराजे : 'माणमाती', साप्ताहिक संपादकीय,
'माणदेशाचे निराळेपण',
आवृत्ती - १७/०८/२००७ पृ.क्र.२

९. इंगोले, कृष्णा : 'माणदेश : स्वरूप आणि समस्या',
माणगंगा प्रकाशन कमलापूर (सांगोले)
प्रथमावृत्ती - १९८८, पृ. क्र. १६.

१०. तत्रैव : पृ. क्र. १५०.

११. माडगूळकर, व्यंकटेश : 'काळी आई',
उत्कर्ष प्रकाशन, पुणे,
तृतीयावृत्ती - १९८२, पृ. क्र. १०३.

| | | | |
|---|---|---|---|
| १२. | मोकाशी, सयाजीराजे | : | 'माणमाती',<br>साप्ताहिक संपादकीय, 'माणदेशाची वैशिष्ट्ये',<br>आवृत्ती -०७/०९/०७ पृ.क्र.४. |
| १३. | इंगोले, कृष्णा | : | 'माणदेश : स्वरूप आणि समस्या',<br>माणगंगा प्रकाशन कमलापूर (सांगोले)<br>प्रथमावृत्ती - १९८८, पृ. क्र. १८. |
| १४. | मोकाशी, सयाजीराजे | : | 'माणमाती',<br>साप्ताहिक , 'माणदेशाची वैशिष्ट्ये',<br>आवृत्ती -२१/०९/०७ पृ.क्र.४. |
| १५. | तत्रैव | : | 'माणमाती',<br>साप्ताहिक , 'माणदेशाची वैशिष्ट्ये',<br>आवृत्ती -१४/०९/०७ पृ.क्र.४. |
| १६. | तत्रैव | : | 'माणमाती',<br>साप्ताहिक , 'माणदेशाची वैशिष्ट्ये',<br>आवृत्ती -३१/०८/०७ पृ.क्र.२. |
| १७. | इंगोले, कृष्णा | : | 'माणदेश : स्वरूप आणि समस्या',<br>माणगंगा प्रकाशन कमलापूर (सांगोले)<br>प्रथमावृत्ती - १९८८, पृ. क्र. १६३. |
| १८. | इंगोले, कृष्णा | : | 'माणदेश : स्वरूप आणि समस्या',<br>माणगंगा प्रकाशन कमलापूर (सांगोले)<br>प्रथमावृत्ती - १९८८, पृ. क्र. ६८. |
| १९. | मुलाटे, वासुदेव | : | 'ग्रामीण कथा : स्वरूप आणि विकास'<br>स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद,<br>द्वितीयावृत्ती - २००५, पृ. क्र. ५. |

२०. भोसले, द. ता. : 'ग्रामीण साहित्य : चिंतन',
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे,
प्रथमावृत्ती - १९८८, पृ. क्र. ४४.

२१. इंगोले, कृष्णा : 'माणदेश : स्वरूप आणि समस्या',
माणगंगा प्रकाशन कमलापूर (सांगोले)
प्रथमावृत्ती - १९८८, पृ. क्र. ९८-९९.

२२. घवी, रवींद्र : 'प्रदक्षिणा खंड दोन', 'स्वातंत्र्योत्तर कविता',
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयनगर, पुणे,
प्रथमावृत्ती - १९९१, पृ. क्र. ९.

२३. पवार. गो. म. : 'साहित्यमूल्य आणि अभिरुची',
साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद,
प्रथमावृत्ती - १९९४, पृ. क्र.१९५.

२४. ठाकूर, रवींद्र : 'मराठी ग्रामीण कादंबरी',
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे,
प्रथमावृत्ती - १९९३, पृ. क्र. ११८.

२५. इंगोले, कृष्णा : 'माणवैभव', दिवाळी अंक,
साठोत्तरी माणदेशी साहित्य,
आवृत्ती -२००५, पृ. क्र. १२.

२६. सावंत, सीमाराम : 'अद्वैत'
वार्षिक नियतकालिक,
दहिवडी कॉलेज, दहिवडी,
आवृत्ती २००७-२००८, पृ. क्र.४४.


-----x-----